# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३**

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ६**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एस-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: ३४७, रूपये:- ११,९६,००,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (१) | ६१५५ | १० | माझ्या कार्यक्षेत्रातील पुरंदर तालुक्याला ऐतिहासिक, धार्मिक, पर्यटन स्थळे निसर्गरम्य वातावरण, औद्योगिक वसाहत, व्यवसाय त्याचप्रमाणे पुण्यालगत असल्याने मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत आहे. माझ्या मतदारसंघात वैद्यकीय शिक्षण सोडून इतर सर्व शैक्षणिक सोयी सुविधा संकुले आहेत परंतु वैद्यकीय महाविद्यालय नसल्याने वैद्यकीय शिक्षण व उपचारसाठी पुणे शहरावर अवलंबून राहावे लागते त्यामुळे पुणे शहरातील आरोग्य विभागावरील पडणारा ताण कमी होईल. पुरंदर तालुक्यामधील सासवड किंवा जेजुरी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय होणेकामी करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. अमित झनक** |
| (२) | ६१३४ | १० | वाशिम जिल्ह्यासाठी मालेगाव तालुक्यात शिवरा मध्ये शासकीय वैद्यकिय महाविद्यालय मंजूर असून शासनाच्या आदेश असून सुद्धा शिवरा येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी लागणारी जागा उपलब्ध न होणे, त्यामुळे जागेअभावी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु न होणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत करावयाची कार्यवाही. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एस-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: ३५०, रूपये:- ६८,००,००,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (३) | ६१८१ | १० | चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालयात औषधांचा पुरवठा वेळेवर होत नसणे,डायलीसीस युनिटच्या २ मशिन्स नादुरुस्त असून ५ अतिरिक्त मशिनची आवश्यकता असणे,रुग्णालयात १ अतिरिक्त सीटी स्कॅन मशिनची आवश्यकता असणे या समस्यांबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे अनेकवेळा मागणी करण्यात येणे, शासकीय रुग्णालयाकरिता नेमण्यात आलेल्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | खाजगी औषध पुरवठादार कंपनीस १ कोटी ५ लक्ष रुपये दरवर्षी अनुदान वर्ग करण्यात येऊनही प्रत्यक्षात कंत्राटदाराकडून वेळेवर औषधांचा,सर्जिकल साहित्य किट्स पुरवठा होत नसणे,वैद्यकीय महाविद्यालय,शासकीय रुग्णालयात कार्यान्वित डायलीसीस युनिटच्या कमी संख्येमुळे खाजगी रुग्णालयातील दर परवडत नसल्याकारणाने गरीब गरजू नागरिकांना वैद्यकीय सेवेपासून वंचित राहावे लागणे,गडचिरोली,यवतमाळ नजिकच्या राज्यातून उपचाराकरिता दाखल होत असूनही रुग्णखाटांच्या कमतरतेमुळे,अपघात वैद्यकीय अधिकारी तसेच शवविच्छेदन करण्याकरिता पूर्णवेळ अध्यापक उपलब्ध नसणे,अधिपरिचारिकेची २७० पदे परिसेविकाचे ३८ पदे रिक्त असल्याने अनेक रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना अडचणी निर्माण होणे,महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंअंतर्गत लाभाची मर्यादा ५ लाख केली असतानांही अधिकाऱ्यांच्या गैरकारभारामुळे सामान्य जनतेला याचा लाभ न होण, नविन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तातडीने स्थलांतरीत करण्याबाबत तसेच रुग्णालयात सोयी सुविधा उपलब्ध करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर- डिसेंबर २३ निवेदनाव्दारे शासनाकडे केलेली असणे या वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालयातील समस्या तातडीने सोडविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एस-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: ३५३, रूपये:- ७,०३,००,०००/-**<br>**श्री. जयंत पाटील** |
| (४) | ६१७० | १०० | नांदेड येथील शासकीय रुग्णालयात २४ तासात २४ रुग्णांचा मृत्यू झाला, ज्यात काही नवजात शिशुंचाही समावेश होता. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज नगर येथेही २४ तासात १० रुग्णांचा मृत्यू झाला आणि त्यानंतर नागपूर शासकीय रुग्णालयात २४ तासात २४ रुग्णांचा दुर्दैवी अंत झाला. ही मृत्यूची साखळी सगल तीन ते चार दिवस महाराष्ट्रात तांडव करत होती. हॉस्पिटलमध्ये योग्य औषध पुरवठा नव्हता, रुग्णांना लागणारे साहित्य नव्हते, स्वच्छेता अभाव होता. ही राज्याच्या आरोग्य यंत्रणेची परिस्थिती आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एस-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: ३५४, रूपये:- २४,२५,५३,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (५) | ६१६५ | १० | मुंबईतील नामांकित रुग्णालय असणा-या सर. जे.जे.ग्रुप रुग्णालयामध्ये औषधाचा तुटवडा असणे मागील काही महिन्यापासून ऑपरेशन थिएटर देखील बंद असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्यामुळे रुग्णाचे हाल होणे, बहुतेक वैद्यकीय चाचण्या बाहेरुन करुन घेतल्या जाणे.त्यामुळे रुग्णामध्ये निर्माण होत असलेली चिड लक्षात घेता शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एस-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**बाब क्रमांक: ३६३, रूपये:- ८१,४०,०००/-**<br>**श्री. जयंत पाटील** |
| (६) | ६१६९ | १०० | सरकारी रुग्णालयात बाहेरून औषधे विकत आणणे, oxygen सिलेंडर ची कमतरता अश्या अनेक गोष्टींची कमतरता आजही रुग्णालयात भासत आहे. एवढेच नाही तर या रुग्णालयात आजही कर्मचारी नाहीत, डॉक्टर नाहीत आणि म्हणून लोकांचे प्राण जात आहेत. दिनांक ६ ऑक्टोबरला मुख्यमंत्री महोदयांनी हेल्थ ऑडिट करण्याचे आदेश दिले होते, आता २ महिन्याहून अधिक होऊन गेले आहे, हेल्थ ऑडिट कुठे आहे असा माझा प्रश्न आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही.” |

---

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : ८ डिसेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर